जलसंधारणाचा 'गडकरी पॅटर्न' नीती आयोगाने स्वीकारला

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि लघु व मध्यम उद्योग खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात विदर्भातील दोन जिल्ह्यात महामार्गाच्या बांधकामादरम्यान राबवण्यात आलेला जलसंधारण पॅटर्न नीती आयोगाने स्वीकारला असून आता तो संपूर्ण देशात राबवण्याची शिफारस विविध राज्यांना करणार आहे.

विदर्भातील वर्धा आणि बुलढाणा जिल्ह्यात हा प्रयोग यशस्वीपणे राबवण्यात आला. त्याबद्दल आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी गडकरी यांचे एका पत्राद्वारे कौतुकही केले आहे.

वर्धा जिल्ह्यात तामसवाडा या आदिवासी गावात खडकाळ जागेवर खड्डे करून. यातील मुरुम आणि माती महामार्गाच्या कामासाठी वापरण्यात आली होती. तसेच नदीनाल्यांचे खोलीकरण करून त्यातील माती, वाळूचाही वापर करण्यात आला होता. पावसाळ्यात खड्ड्यामध्ये पाणी साचले तर नदी नाल्यांमध्ये खोलीकरणामुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण झाला आणि आसपासच्या नैसर्गिक जलस्रोतांचा पाण्याचा स्तर वाढला.

संपूर्ण देशात राबवणार

परिणामी पिण्यासाठी व शेतीच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले.

बुलढाणा जिल्ह्यातही राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी रस्त्याच्या जवळील तलाव आणि नदी-नाल्यांमध्ये खोदकाम करण्यात आले. परिणामी, तलाव, नदी-नाल्याचे आपोआप खोलीकरण झाले आणि त्यात पाणीसाठा होऊ लागला. या खड्ड्यांमध्ये आता पावसाचे पाणी जमा झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे एकूण १२ प्रकल्प असून त्याची लांबी ४९१ किमी आहे. या लांबीच्या कामासाठी जवळच्या तलाव, नदी, नाल्यातून ६५.५९ लाख क्यूबिक मीटर मुरुम-माती काढण्यात आली. यामुळे ६५५९ टीसीएम पाणीसाठा झाला आहे व १५२ गावांना याचा लाभ मिळाला. बुलढाणा जिल्ह्यात राबवण्यात ५ लाख लोकसंख्येला पाणीटंचाईपासून दिलासा मिळाला आहे. महामार्गासाठी करण्यात आलेल्या या खोलीकरणामुळे जमा झालेल्या पाणीसाठ्यामुळे २२ हजार ८०० विहिरींना पाणी आले आणि १५२५ हेक्टर जमिनीच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले.

राज्यात विदर्भाच्या नागपूर विभागात ३४ प्रकल्प, कोकणच्या मुंबई विभागात ३ प्रकल्प, पुणे विभागात ५ प्रकल्प तर मराठवाड्याच्या औरंगाबाद विभागात १८ प्रकल्प बुलढणा पॅटर्ननुसार राबवले जात आहे.

असा आहे गडकरी पॅटर्न

महामार्गासाठी लागणारी माती व मुरूम उपलब्ध व्हावा म्हणून रस्त्यालगतच खड्डे खोदणे व त्यातील मुरूम घेणे तसेच नदी व नाल्यांचे खोलीकरण करून त्यातून माती काढून ती महामार्गासाठी वापरणे. केलेल्या खड्ड्यात व खोलीकरणामुळे नद्या व नाल्यांमध्ये पावसाळ्यात पाणीसाठा वाढत असल्याने परिसरातील नैसर्गिक जलस्रोतात वाढ होते व त्यामुळे पाणी टंचाईवर मात करता येते व शेतीलाही पाणी मिळते.

सुशांतच्या नातेवाईक आमदाराची संजय राऊत यांना नोटीस

वृत्तसंस्था, पाटणा

वृत्तपत्रातून लिहिलेल्या एका स्तंभात अभिनेता सुशांत सिंह राजपूत याचे त्याच्या वडिलांशी संबंध ताणलेले होते, असा आरोप केल्याने शिवसेना नेते संजय राऊत यांना सुशांतचा चुलतभाऊ व बिहारमधील भाजप आमदार असलेल्या नीरज कुमार बबलू यांनी वकिलामार्फत कायदेशीर नोटीस दिली आहे.

काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रात लिहिलेल्या लेखात राऊत यांनी म्हटले होते की, सुशांत सिंह राजपूत याचे त्याच्या कुटुंबीयांशी व वडिलांशी असलेले संबंध दुसऱ्या विवाहानंतर बिघडलेले होते. सुशांतचे चुलत बंधू भाजप आमदार नीरज कुमार बबलू यांच्या वतीने वकील अनिश झा यांनी संजय राऊत यांना पाठवलेल्या नोटिशीत म्हटले आहे की, राऊत हे संसदेचे सदस्य व पक्षाचे जबाबदार प्रवक्ते आहेत. त्यांनी जे निराधार आरोप केले आहेत त्याबाबत ४८ तासात माफी मागावी. त्यांनी माफी मागितली तर आम्ही पुढची कारवाई करणार नाही, पण जर माफी मागितली नाही तर कायदेशीर कारवाई करू.

बबलू यांनी म्हटले आहे की, सुशांतचे सत्तरीतील वडील के.के. सिंह यांनी त्यांची पहिली पत्नी २००२ मध्ये वारल्यानंतर पुन्हा विवाह केला व त्यामुळे सुशांतचे त्यांच्याशी संबंध बिघडले होते हा आरोप चुकीचा आहे. सुशांतच्या वडिलांनी गेल्या महिन्यात सुशांतच्या मृत्यूनंतर चाळीस दिवसांनी पाटणा येथे प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला होता.

रशियन लशीची सुरक्षितता सांगणे कठीण

चाचणीचे काही टप्पे गाळल्याचा भारतीय तज्ज्ञांचा आरोप

वृत्तसंस्था, हैदराबाद

रशियाने कोविड १९ वर तयार केलेल्या लशीची परिणामकारकता आणि सुरक्षितता याबाबत माहितीअभावी आताच काही सांगता येणार नाही, असे सेंटर फॉर सेल्युलर अँड मॉलिक्युलर बायॉलॉजी या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

रशियाने कोविड १९ वर लस तयार केली असून त्याची अधिकृत नोंदणीही केली आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या मुलीला ही लस देण्यात आली. सेंटर फॉर सेल्युलर अँड मॉलिक्युलर बायॉलॉजी या संस्थेचे संचालक राकेश के. मिश्रा यांनी सांगितले की, जर लोक नशीबवान असतील तर रशियन लस चांगले काम करील. त्यांनी त्या लशीच्या योग्य चाचण्या घेतलेल्या नसल्याने त्या लशीची परिणामकारकता आणि सुरक्षितता सांगता येत नाही. तिसऱ्या टप्प्यातील चाचण्या न घेताच त्यांनी लस जारी केली. तिसऱ्या टप्प्यात लशीची परिणामकारकता कळत असते. जेव्हा ती जास्त लोकांना दिली जाते व दोन महिने वाट पाहिली जाते तेव्हा त्या लोकांमध्ये पुन्हा विषाणू संसर्ग होतो की नाही हे स्पष्ट होते पण रशियाने तसे काही केल्याचे दिसत नाही. त्यांनी तिसऱ्या टप्प्यातील चाचण्या केलेल्या नाहीत. जर केल्या असतील तर त्यांनी त्याची माहिती सादर करावी, ही माहिती गोपनीय ठेवता येत नाही.

मिश्रा म्हणाले की, कुठल्याही लशीचे काळजीपूर्वक मूल्यमापन करावे लागते. जर रशियाची लस सुरक्षित नसेल तर कुठल्याही देशाने तिला परवानगी देऊ नये. टप्पा १,२,३ मधील चाचण्या होणे अपेक्षित आहे. त्यात रशियाने काही टप्पे गाळले आहेत. रशियाने दोन महिन्यांपूर्वी वेगाने लस तयार करण्याचा कायदा केला होता. लशीसाठी कायदा करणे कितपत योग्य आहे.

भारतातील लशींबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर झालेले नाहीत. ते ऑगस्ट अखेरीस किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात येतील. हे निष्कर्ष उत्साहवर्धक असतील याची खात्री आहे पण तिसऱ्या टप्प्यातील निष्कर्ष त्यापेक्षा महत्त्वाचे असतात.

रशियाच्या स्पुटनिक -व्ही या लशीचा पहिला डोस गमालेया नॅशनल रीसर्च सेंटर फॉर एपिडेमॉलॉजी अँड मायक्रोबायॉलॉजी या संस्थेने पुतिन यांच्या मुलीला दिला होता. आता तिची प्रकृती चांगली आहे. पुतिन यांनी असा दावा केला की, या लशीने करोनाविरोधात पूर्ण प्रतिकारशक्ती तयार होण्यास मदत झाली आहे.

अमेरिकी आरोग्यमंत्रीही साशंक

वृत्तसंस्था, तैपेई

करोनाची लस सर्वप्रथम तयार करण्यासाठी कुठलीही स्पर्धा लागलेली नाही. रशियाने जरी 'स्पुटनिक व्ही' ही लस तयार करून ती जारी केली असली तरी त्याबाबत साशंकता आहे, असे मत अमेरिकेचे आरोग्य मंत्री ॲलेक्स अझार यांनी व्यक्त केले आहे.

रशियाची करोना लस

सध्या ते तैवानच्या दौऱ्यावर असून त्यांनी सांगितले की, रशियाच्या लशीमागचे विज्ञान व सुरक्षितता याबाबत शंका आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी करोना लशीला काल मान्यता दिली होती. त्यांच्या मुलीला ही लस टोचण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला.

या घटनाक्रमावर अझार यांनी सांगितले की, अमेरिका लस तयार करताना सरकारी ताकद, अर्थव्यवस्था व जैवऔषध उद्योग यांचा वापर करीत आहे. आमची लस ही आमच्या लोकांसाठी तर असेलच पण ती जगातील लोकांना उपलब्ध केली जाईल, विशेष म्हणजे ती प्रभावी व सुरक्षित असेल. अमेरिकेने मॉडर्ना कंपनीच्या लशीसाठी उत्पादन करार केला आहे. इतर पाच कंपन्याही लस तयार करीत असून त्यांच्याशीही पुरवठा करार केले आहेत. ज्या सहा कंपन्यांशी करार केले आहेत त्यातील चार कंपन्यांच्या लशीचे निष्कर्ष चांगले असून त्यामुळे कोविड १९ मधून वाचलेल्या लोकांमध्ये जेवढे प्रतिपिंड असतात त्यांच्यापेक्षा जास्त प्रतिपिंड लस दिलेल्या लोकांमध्ये तयार करता आले आहेत. दोन कंपन्यांच्या लशी या तिसऱ्या टप्प्यात असून रशियाने त्यांच्या लशीच्या तिसऱ्या टप्प्यातील चाचण्या केलेल्या नाहीत त्यामुळे त्या चाचण्यांच्या निष्कर्षांची माहितीही नाही त्यामुळे या लशीचा प्रभाव व सुरक्षितता याबाबत शंका आहे. अमेरिकेची लस सुरक्षित व प्रभावी असेल तसेच वर्षअखेरीस या लशीचे लाखो डोस उपलब्ध केले जातील.

केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांना करोनाची लागण

नवी दिल्ली : केंद्रीय आयुष मंत्री श्रीपाद नाईक यांना करोनाची लागण झाली आहे. त्यांनी स्वतः ट्विट करून याबाबत माहिती दिली.'मी करोनाची चाचणी केली आणि त्या चाचणीचा निकाल पॉझिटिव्ह आला आहे. मी आता घरीच विलगीकरणात आहे. गेल्या काही दिवसांमध्ये माझ्या संपर्कात आलेल्यांनी आपली करोना चाचणी करावी आणि आवश्यक ती काळजी घ्यावी', असे ते म्हणाले. नाईक यांच्यापूर्वी केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि केंद्रीय मंत्री कैलाश चौधरी यांनाही करोनाची लागण झाली होती.

NOTICE

Shrimati **Roshan Ahmed Lilani** a Member of the Clover Terrace Co-operative Housing Society Ltd. having address at and holding Flat No. **4A** in the building of the society, died on **6 May 1993** without making any nomination. The society hereby invites claims or objections from heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of days from publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above. the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/objections. if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the offices of the society/with the secretary of the society/with the secretary of the society between **10 AM to 5 PM** from the date of publication of the notice till the date of expiry of this period

For and on behalf of
The Clover Terrace Co-op. Housing Society Ltd.

Place: Pune
Date: 13/08/2020 **Hon. Secretary**

PUBLIC NOTICE

Take notice that Shri. Harsh Kiran Bafna has unconditionally given my client as a security of his share in his jointly owned immovable properties mentioned in Schedule hereunder. Shri Harsh Kiran Bafna is hereby intending to sell his 1/3rd share and our client is intending to purchase the immovable property described in the **Schedule** hereunder written, free from all encumbrances. Any person(s) having any claim or right or interest in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession, attachment, charge, maintenance, easementary right, possession of original title deeds or encumbrance or any other right, title, etc. howsoever or otherwise, is/are hereby required to intimate to the undersigned within **7-** days from the date of publication of this notice of his/her/their claim(s), if any, with all the supporting documents failing which the transaction shall be completed without reference to such claim(s) and the claim(s), if any, of such person(s) shall be treated as waived and not binding on our client. However, no person shall enter into agreement for sale, purchase, mortgage, lease, lien, license or create interest in the immovable property mentioned hereunder without prior permission of my client.

SCHEDULEOF THE PROPERTY

All that piece and parcel of land mentioned as below:
1) 1/3rd right in Plot no. B-31 admeasuring an area of 4010 sq. mtrs in scheme Golden Horizon, said land situated within the limits of District Pune, taluka Mulshi and within the limits of Zilla Parishad Pune and Grampanchayat Mouje BHugaon/Bavdhan bearing survey no. 2230/3, 221/81 to 4, 222/2, 223/1, 223/2, 224/1, 225/1/1, 225/1/2, 225/4, 226/1/1, 226/1/2, 226/2, 227, 228 & 261 village Bhugaon/Bavdhan, admeasuring 16 Hector 79 Are.
2) 1/3rd right inimmovable property situated at S. no. 465/B/9, admeasuring 10416 Sq. ft. which is forming part of and out of property bearing corresponding CTS no. 1085 totally admeasuring 25879.54 sq. mtrs., at Bhamburda, Shivajinagar, Pune

Adv. Piyush S. Chobe,
Office # 305, OM Chambers, 3rd Floor, Above Hotel Panchali, J. M. Road, Pune 410015, (+91-9890549359)

ADITYA BIRLA CAPITAL
PROTECTING INVESTING FINANCE ADVISING
Aditya Birla Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय: इंडियन केपाऊंड, वेगवल, गुजरात 362266.
शाखा कार्यालय: तिसरा मजला, सिग्नेचर स्क्वेअर, भांडारकर रोड, पुणे-411004

परिशिष्ट IV [नियम 8(1) पाहा]
ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे 'आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड'चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत कर्जदार श्री कम्मेल किशोर, श्रीमती कोमल कपूर आणि रेव मुतू यांना दि. 2 जानेवारी, 2020 रोजी एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेत नमूद रक्कम रु. 73,51,622/- (रुपये त्र्याहत्तर लक्ष एक्कावन्न हजार सहाशे बावीस फक्त) थकबाकी मुद्दल व इतर थकबाकीसह (विलंब शुल्कांसह) परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत दि. 11 ऑगस्ट, 2020 रोजी खाली नमूद मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.

कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड च्या रु. 73,51,622/- (रुपये त्र्याहत्तर लक्ष एक्कावन्न हजार सहाशे बावीस फक्त) अधिक त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

सदर प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदीकडे वेधण्यात येते.

अचल मालमत्तेचे तपशील
सदनिका क्र. 704, सातवा मजला, बिल्डींग-एफ, मिस्टिक मूड्स, स.क्र. 230ए/3/1, 230ए/5, 231/1/1, लोहेगाव, विमाननगर, विमानतळ रोड, दोराबजी मॉलजवळ, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र, भारत ङ्क 411014. चतुःसीमाः पूर्वेसः लिफ्ट, पश्चिमेसः मोकळी जागा, उत्तरेसः मोकळी जागा, दक्षिणेसः शेजारील सदनिका

दिनांक : 13/08/2020 **प्राधिकृत अधिकारी**
स्थान : पुणे आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

accelya
ACCELYA SOLUTIONS INDIA LIMITED
Registered Office : "Accelya Enclave", 685/2B & 2C, 1st Floor, Sharada Arcade, Satara Road, Pune - 411 037 Tel : +91-20-66083777 Fax : +91-20-24231639
Email : **accelyaindia.investors@accelya.com** Website : **https://w3.accelya.com**
CIN: L74140PN1986PLC041033

NOTICE

Notice is hereby given, pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations And Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, 20th August, 2020, to consider, inter alia, the audited financial results for the quarter and year ended 30th June, 2020 and recommendation of final dividend, if any.

For further details, please visit the website of the Company (https://w3.accelya.com) or that of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

For Accelya Solutions India Ltd.
Sd/-
Place : Pune **Ninad Umranikar**
Date : 12/08/2020 Company Secretary

ASPIRE HOME FINANCE
अॅस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड
मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.
ई-मेल: info@ahfcl.com सीआयएन: यू६५९२३एमएच२०१३पीएलसी२४८७४१

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हीत कायदा, २००२ची अंमलबजावणीच्या नियम ८ (१) च्या अनुपालनार्थ आणि सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ वासह वाचलेल्या कलम १३(१२) कलम अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत अॅस्पायर 'होम फायनान्स कार्पोरेशन लिमिटेड'चे प्राधिकृत अधिकार म्हणून असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या प्रत्येक लेखांच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधीत ऋणकोंवर फर्माविणारी प्रत्येक लेखाच्या अनुसार नमूद केलेल्या तारखे दिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको व आमजनतेस सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक लेखांच्या अनुसार नमूद केलेल्या तारखां दिवशी उक्त नियमांच्या नियम ८ वासह वाचलेल्या उक्त कायद्याच्या १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरुन ऋणको व आमजनतेस याद्वारा सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करु नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्यानुसार रक्कम व त्यावरील व्याज या रकमेकरिता अॅस्पायर होम फायनान्स कार्पोरेशन लिमिटेडच्या आकाराच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींवर ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

अ. क्र.	लोन अॅग्रीमेंट नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख व रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन
१.	एलएक्सडीएयू००४१६-१७००२८६९५/ **योगेश मारुती निंबाळकर व पुष्पा मारुती निंबाळकर**	१८-०२-२०१९ रु. ७२१३७२/- करिता	०७-०८-२०२०	मिळकत नं. ९७९, अॅट शेठफलगडे, बारामती भिगवान रोड, कदम वस्ती जवळ, इंदापूर, पुणे-४१३१३०, महाराष्ट्र.
२.	एलएक्सडीएयू००४१६-१७००४७६४१/ **राजेंद्र सुदाम कुटवल व मंदाकिनी राजेंद्र कुटवल**	०४-०५-२०१९ रु. ५१८४८७/- करिता	०८-०८-२०२०	मिळकत नं. १४७३, अॅट मंधावगन पराठा चकूर वस्ती, गजानन मंदिराजवळ, ता. शिरुर, जि. पुणे-४१२२११, महाराष्ट्र.
३.	एलएक्सडीएयू००४१५-१६०००६६५०/ **श्रीराम दिलीप यादव व चंगुना श्रीराम यादव**	२७-०४-२०१९ रु. १४९३८३३/- करिता	०८-०८-२०२०	मिळकत नं. ८३२, अॅट पोस्ट देवुळगाव राजा, हिंगाणी बेडी रोड जवळ, दौंड, पुणे-४४३२०४, महाराष्ट्र.
४.	एलएक्सपीयूएन००३१५-१६००२१५७९/ **हरीशकुमार प्रयागदत्ता यादव व राजमातादेवी प्रयागदत्ता यादव**	०४-०५-२०१९ रु. १२१२३१८/- करिता	१०-०८-२०२०	फ्लॅट नं. १४, ४था मजला, स्वरगंध हाईट्स, मानाजी नगर, नऱ्हे हवेली पुणे, दारोडे प्रोजेक्टजवळ, पुणे-४११०४१, महाराष्ट्र.
५.	एलएक्सएसएटी००३१६-१७००५०७५२/ **शिवाजी वीरा शेंबाडे व सीमा शिवाजी शेंबाडे**	१३-१२-२०१८ रु. १३१४८१०/- करिता	०८-०८-२०२०	फ्लॅट नं. ०६, दुसरा मजला, प्लॉट नं. ५६, सर्व्हे नं. २/१/१ए, श्री साई प्रसाद अपार्टमेंट, जाधववाडी फलटण, सातारा-४१५५२३, महाराष्ट्र.
६.	एलएक्सएसएटी००११६-१७००२८१०२/ **हनमंत राउ यादव व सुरेखा हनमंत यादव**	१५-११-२०१९ रु. १९६५५९५/- करिता	१०-०८-२०२०	फ्लॅट नं. २० व २२, तिसरा मजला, पुजा हाईट्स, सर्व्हे नं. ५५/२बी/२, रॉयल पार्क हॉटेल जवळ, बानावाडी, कराड, सातारा-४१५५१०, महाराष्ट्र.

स्थळः महाराष्ट्र, **दिनांकित:** १३/०८/२०२० (स्वाक्षरी) - **प्राधिकृत अधिकारी, (अॅस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि.)**
(भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही तिचे **विद्यमान मालक १) श्री. कृष्णमूर्ती राघवेंद्रराव आंबेकर आणि २) सौ. रेखा कृष्णमूर्ती आंबेकर,** दोघेही रा. पुणे यांच्या स्वसंपादित खरेदी मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशीलांना विक्रीस देण्याबाबत अंतिमतः मान्य व कबूल करुन विसारादाखल रक्कम स्विकारलेली आहे. मिळकतीचे विद्यमान मालकांच्या म्हणण्यानूसार सदर मिळकत पुर्णतः निर्वेध, निजोखमी व पणनयोग्य आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही गहाण, दान, ताबा, बँक बोजा, लेखी व तोंडी करार, कोर्ट अटॅचमेन्ट, लिज, लिन, विसारपावती, साठेखत, खरेदी करार, कुळ, हक्क, कोर्ट वाद, डिक्री, दरखास्त, मनाई हुकूम, पोटगी हक्क, बक्षिस व वारसा, विकसनहक्क, मुखत्यार पत्र, इजमेंट, खरेदीचा अग्रहक्क, वहिवाटीचा, अगर रस्त्याचा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केल्यापासून **८ (आठ) दिवसांचे आत** खालील पत्त्यावर अस्सल व मुळ कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हिझा हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहित व पणनयोग्य असल्याचे समजून, त्यावर इतर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास तो जाणिवपूर्वक समजून, उमजून सोडून दिलेला आहे असे समजून पुढील हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागावून कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रार हवेली यांचे हद्दीतील पुणे प्रादेशिक आराखड्यानुसार निवासी विभागात समाविष्ट असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील **वडगांव बुद्रुक** येथील **सर्व्हे क्र. ११ हिस्सा क्र. ६+७ (एकूण क्षेत्र २ हे. १५ आर)** मधील **३२४८.६७ चौ.फूट** क्षेत्रफळाचा **प्लॉट क्र. ०४** हा या जाहीर नोटीसीचा विषय असुन यांसी **चतु:सिमा खालीलप्रमाणे** :-

पुर्वेस :- सर्व्हे क्र. ११, हिस्सा क्र. ६ +७ मधील प्लॉट क्र. ०३,
पश्चिमेस :- सर्व्हे क्र. ११, हिस्सा क्र. ६ + ७ मधील प्लॉट क्र. ०५,
दक्षिणेस :- सर्व्हे क्र. ११, हिस्सा क्र. ६ + ७ मधील मिळकत,
उत्तरेस :- सामाईक रस्ता.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
पुणे, तारीख : १२/०८/२०२० **ॲड. सौ. अनुष्का अ. भावे**
द्वारा, श्री. गोविंद रामचंद्र क्षीरसागर, सनसिटी, फ्लॅट क्र. ए-०८/२०४, आनंदनगर, सिंहगड रोड, वडगांव (बुद्रुक), पुणे ४११०५१. दूरध्वनी : ९८५०५०३५०३

MANAPPURAM HOME FINANCE LTD.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
युनिट क्र. 301-205, तिसरा मजला, ए विंग, कनकिया वॉल स्ट्रीट, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-400093, संपर्क क्र. 022-68194000/022-66211000

शुद्धिपत्रक

1. दि. 18-06-2020 रोजी **'फायनॅन्शिअल एक्सप्रेस'** आणि **'लोकसत्ता'** मध्ये प्रकाशित 'विक्री सूचने'ची जाहिरात पाहावी.
कर्जदार व सह-कर्जदार, कर्ज खाते क्र.: बाबू भागवत माने/ आरती बाबू माने, कर्ज अर्ज क्र. WPUNE0000063, पुणे स्वारगेट, अनामत मत्तेचा तपशीलः स.क्र. 126, प्लॉट क्र. 27 व 28, गणेश आंगण, पाचवा मजला, सदनिका क्र. 13, मोहन नगर, चिंचवड, पिन-411019. थकबाकी रक्कम (रु.): रु. 26,47,000/-, आरक्षित किंमत (रु.): रु. 20,03,575/-, बयाणा रक्कम (रु.): रु. 5,00,894/- लिलावाचा दिनांक व वेळः 20/07/2020 रोजी दु. 3:00 वाजता.

2. दि. 29-07-2020 रोजी **'फायनॅन्शिअल एक्सप्रेस'** आणि **'लोकसत्ता'** मध्ये प्रकाशित 'शुद्धीपत्रका'ची जाहिरात पाहावी.
कर्जदार व सह-कर्जदार, कर्ज खाते क्र.: बाबू भागवत माने/ आरती बाबू माने, कर्ज अर्ज क्र. WPUNE0000063, पुणे स्वारगेट, अनामत मत्तेचा तपशीलः स.क्र. 126, प्लॉट क्र. 27 व 28, गणेश आंगण, पाचवा मजला, सदनिका क्र. 13, मोहन नगर, चिंचवड, पिन-411019. आरक्षित किंमत (रु.): रु. 17,50,000/- लिलावाचा दिनांक व वेळः 20/07/2020 रोजी दु. 3:00 वाजता.
अनामत मत्तेचा तपशील याप्रकारे वाचण्यात यावाः **"सदनिका क्र. 704, सातवा मजला, गट क्र. 1599, देहू आळंदी रोड, अभंग विश्व, चिखली, पुणे 412 114"**
सूचनेतील इतर तपशील पूर्वीप्रमाणेच राहील.

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
मनप्पुरम होम फायनान्स लि

जाहिरात क्र. १/२८६, दि. १२/०८/२०२०

पुणे महानगरपालिका
मोटार वाहन विभाग
मुदतवाढ (रि-टेंडर)

पुणे महानगरपालिकेच्या खाली नमूद केलेल्या विभागाकडील कामांना मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कामाबाबतच्या निविदा अटी, शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचमध्ये नमूद केलेला आहे व निविदा संच Online वर निःशुल्क पाहावयास उपलब्ध आहे.

टेंडर विक्री कालावधी
दिनांक १३/०८/२०२० ते २४/०८/२०२०, दु. २.३० पर्यंत.
टेंडर स्वीकृती कालावधी
दिनांक १३/०८/२०२० ते २४/०८/२०२०, दु. २.३० पर्यंत.
टेंडर उघडणे कालावधी
दिनांक २७/०८/२०२०, दु. ०३.३० वा.

अ. क्र.	खात्याचे नाव	मुदतवाढ टेंडर क्रमांक
१)	मोटार वाहन विभाग	PMC/Vehicle/2020/37

१) वरील टेंडर्सची विक्री व स्वीकृती ***www.punecorporation.org*** व ***www.mahatenders.gov.in*** या संकेतस्थळावरून फक्त ऑनलाईन चालू आहे.
२) बाकी सर्व मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे कायम राहील.

सही/-
- कार्यकारी अभियंता (यांत्रिकी),
मोटार वाहन विभाग,
पुणे महानगरपालिका.

KIRLOSKAR PNEUMATIC COMPANY LIMITED
A Kirloskar Group Company
Registered Office:
Hadapsar Industrial Estate, Pune - 411013
CIN: L29120PN1974PLC110307

Kirloskar
Enriching Lives

UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2020
(₹ in Lacs)

Sl. No	Particulars	Quarter Ended 30-06-2020 Unaudited	Quarter Ended 30-06-2019 Unaudited	Year Ended 31-03-2020 Audited
1.	Total Income from operations	8,265	18,178	83,960
2.	Net Profit/(Loss) for the period (beforeTax, Exceptional and/or Extraordinary items)	(808)	511	7,192
3.	Net Profit/(Loss) for the period beforeTax (after Exceptional and/or Extraordinary items)	(808)	511	7,192
4.	Net Profit / (Loss) for